नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/१०/२०२६ (बुधवार )

---

## मौजा चांपा शिवारातील ग्रीन फार्ममधील अश्लील नृत्यप्रकार प्रकरणामध्ये २६ पेक्षा जास्त आरोपींविरूध्द गुन्हा नोंद, पाचगाव पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन पाचगाव:— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्यासह पाचगाव पोलीसांनी मौजा चांपा शिवारातील ग्रीन फार्ममधील अश्लील नृत्यप्रकार प्रकरणामध्ये २६ पेक्षा जास्त आरोपी विरूध्द गुन्हा नोंद केला आहे.**

दिनांक ०८/१०/२०२६ व ०९/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पाचगाव हद्दीतील चांपा शिवारातील ग्रीन फार्म येथे आयोजित इव्हेंटमध्ये अश्लील हावभाव करून नृत्य केले असल्याची गोपनीय माहिती पाचगाव पोलीसांना मिळाली.पोलीसांनी बातमीची शाहनिशा करणेकामी घटनास्थळी जाऊन चौकशी केली तसेच दिनांक ०८/१०/२०२६ व ०९/१०/२०२६ रोजी आयोजित कार्यक्रमांदरम्यानच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, काही महिला व पुरुष अश्लील हावभाव करून संगीताच्या तालावर नृत्य करताना दिसून आले.

सदर प्रकरणी १) रामलु कोंडया सुलतान, वय ७० वर्षे, रा. ग्रीन लॉन, तिघोरी टोल टॅक्सजवळ, नागपूर **(मालक— ग्रीन फार्म)** २) आरिफ अनवर खान, वय ४० वर्षे,रा. प्लॉट नं. ११०५, आशीर्वाद नगर, नागपूर **(मॅनेजर ग्रीन फार्म)** ३) आरिफ सुलेमान शेख, वय ४२ वर्षे, रा. गोसेबुर्द, ता. पवनी, जि. भंडारा **(केयर टेकर ग्रीन फार्म)**, यांच्यासह **ग्राहक आरोपी** क्रं ४) सुरेश वासुदेव वासेकर, रा. शिवाजीनगर कॅम्प, वॉर्ड क्र. १८, गडचिरोली, ५) अनुप नरेश निखाडे, ६) मनु संजय सोनी ,रा. वॉर्ड क्र. १५, कटंगी, बालाघाट, मध्य प्रदेश,७) मानव महेश सरेका ,रा. अभिरूची गार्डन मागे, जठारपेठ, उमरा, अकोला, ८) बलदेवराम बेगाराम चौधरी, रा. झाडे प्लॉट, भद्रावती, जि. चंद्रपूर, ९) उमंग विपिन अग्रवाल , रा. देउरवाडा रस्ता, शिवाजी वॉर्ड, आर्वी.जि वर्धा,१०) जय सुधाकर राऊत ,रा. प्लॉट नं. १६, न्यू सुभेदार रोड, गजानन

मंदिराजवळ, शिवराम नगर, अयोध्यानगर, नागपूर.११)जिगर हिमतभाई पोकार, रा. दुर्गा सोसायटी, वॉर्ड क्र. २, येरखेडा, कामठी, १२) अनिल सदाशिव तायवाडे, रा. दुर्गा सोसायटी, वॉर्ड क्र. २, येरखेडा, कामठी.१३) अक्षय किशोरकुमार झाबिया, रा. प्लॉट नं. ३६, लाईन नं. ३, दयानंद पार्क, कस्तुरबा नगर, जरीपटका, नागपूर, १४) हितेश प्रल्हादकुमार बठेजा, रा. कमला निवास, गौतम बुद्ध वॉर्ड, श्रीनगर, गोंदिया, १५) किशोर रमेश साळवे, रा. प्लॉट नं. १/बी, हनुमान नगर, नागपूर, १६) जिग्नेश प्रवीण पोकार, रा. दुर्गा सोसायटी, वॉर्ड क्र. २, येरखेडा, कामठी,१७) प्रीतम खुशाल रामटेके, १८) राम कन्हैयालाल अग्रवाल १९) पिंटू छोछू शर्मा रा. रामकृष्ण नगर, न्यू मंगलधाम सोसायटी, दत्तवाडी, नागपूर. २०) विवेक माणिक कुडे, रा. प्लॉट नं. २५, भावनाथ सोसायटी, वडगाव, जि. चंद्रपूर, २१) अजय राजपूत, रा. सिताबर्डी, नागपूर, २२) प्रदीप धवडे ,रा. झाडे प्लॉट, भद्रावती, जि. चंद्रपूर.तसेच ४ महीला आरोपी आणि गुन्हयात सहभागी इतर आरोपी यांच्या विरूध्द महाराष्ट्र हॉटेल उपाहारगृहे व मद्यपान कक्ष यामध्ये अश्लील नृत्य करणे व नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत आणि त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ चे कलम ३,८(१),(२),(४) सह कलम भारतीय न्याय संहिता कलम २९६ व ३ (५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पाचगाव पोलीस इतर आरोपींचा शोध घेत आहे.

पोलिसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ६४,१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नागपूर ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध कृत्यांना आळा घालण्यासाठी सातत्याने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

## पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत खुनाचा गुन्हा उघड
## १ आरोपी अटक

**जालालखेडा पोलीस स्टेशन :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे , प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्या नेतृत्वात जलालखेडा पोलीसांनी **खुनाचा गुन्हा** उघड करून एका आरोपीला अटक केले आहे.

दिनांक १३/१०/२०२६ रोजी मौजा नायगाव ठाकरे जलालखेड ते भारसिंगी जाणाऱ्या रोडवर शितल सुभाष चरपे, वय २८ वर्षे, रा. जालालखेडा हिला भरधाव अज्ञात वाहनाने धडक दिल्याने ती गंभीर जखमी झाली होती. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी जालालखेडा पोलीस स्टेशन येथे कलम १०६(१) व २८१ भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

जालालखेडा पोलीसांनी सदर गुन्ह्याचा सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू केला असता, मृतक शितल चरपे ही घटनेदिवशी आरोपी विकास रामराव कांबडे, रा. आमनेर, ता. वरूड जि अमरावती याच्या ऑटोमध्ये बसून गेली असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पोलीसांनी तात्काळ आरोपी विकास कांबडे याला ताब्यात घेऊन कौशल्यपूर्ण विचारपूस केली.

तपासादरम्यान आरोपी आणि मृतक यांच्यात प्रेमसंबंध असल्याचे तसेच घटनेच्या दिवशी दोघांमध्ये वाद झाल्याचे निष्पन्न झाले. या वादातून आरोपीने मौजा नायगाव ठाकरे जलालखेडा ते भारसिंगी जाणाऱ्या रोडवर  शितल चरपे हीला चालत्या ऑटोतुन बाहेर फेकुन तिचा खून केल्याचे पोलीस तपासात उघड झाले. त्यामुळे सुरुवातीला अपघाताचा प्रकार वाटणाऱ्या या घटनेमागील खुनाच्या गुन्हयाची जलालखेडा पोलसांनी उकल केली.

सदर गुन्ह्यामध्ये कलम १०३(१) भान्यासं अन्वये कलमवाढ करण्यात आली असून, आरोपी विकास रामराव कांबडे, वय ३५ वर्षे,रा. आमनेर, ता वरूड जि अमरावती याला अटक करण्यात आली आहे.मा न्यायालयाने आरोपीला दिनांक १६/१०/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

## पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत खुन प्रकरणामध्ये अज्ञात आरोपी निष्पन्न २ आरोपींना अटक

पोलीस स्टेशन देवलापार :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात सावनेर आणि देवलापार पोलीसांनी संयुक्तरीत्या तपास करून खुनाचा गुन्हा उघड केला. सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक केले आहे.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, शिवकुमार अनिलकुमार सोनेश्वर हे सावनेर बसस्थानक येथून आपल्या गावी परसवानी, जि. सिवनी (मध्य प्रदेश) येथे जाण्यासाठी निघाले होते. मात्र, ते घरी न पोहोचल्याने त्यांच्या अपहरणाबाबत पोलीस स्टेशन सावनेर येथे तक्रार दाखल करण्यात आली होती.

सदर प्रकरणाच्या तपासादरम्यान सावनेर पोलिसांनी आरोपीचा शोध घेत असताना, मृतक हा एमएच—४०/सीयू—०८९७ क्रमांकाच्या मोटारसायकलने प्रवास करीत असल्याची खात्रीशीर

माहिती मिळाली. मोटारसायकलच्या मालकीबाबत सखोल तपास केला असता, ती आकाश गुणवंता धुर्वे, रा. कोथुर्णा, ता. सावनेर, जि. नागपूर याच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सावनेर व देवलापार पोलिसांनी संयुक्तरीत्या सखोल व कौशल्यपूर्ण तपास करून आरोपी आकाश गुणवंता धुर्वे,,वय २८ वर्षे, व विलास मधुकर ईनवाती ,वय २८ वर्षे, दोन्ही रा. कोथुर्णा, ता. सावनेर, जि. नागपूर यांच्याबाबत माहिती मिळवली. तपासादरम्यान, दोन्ही आरोपींनी मृतकाला गावी सोडण्याच्या बहाण्याने मोटारसायकलवर नेले. मौजा चोरबाहुली, पोलीस स्टेशन देवलापार हद्दीत झालेल्या वादातून त्याला मारहाण करून डोक्यावर दगडाने वार करीत खून केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी मृतदेहाचाही शोध घेतला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन देवलापार येथे दोन्ही आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास देवलापार पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कुही येथे अप क्र ११७/२०२५ कलम १३७ (२), १४३ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १३ वर्षे ०६ महीने हीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात श्री पोलीस निरीक्षक मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण, पोउपनि कुणाल शेडमाके, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोलीस अंमलदार पन्नालाल बटाउवाले, पोलीस अंमलदार भाग्यश्री राउत, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १३/१०/२०२६ रोजी गोपनिय माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी ही भंडारा जिल्हा येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीस ताब्यात घेतले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास कुही पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १ लाख ८४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक १३/१०/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा घरतवाडा शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा घरतवाडा शेतशिवार येथे सार्वजनिक ठिकाणी पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) मोहन बाबाराव चामलाटे, रा खुटंबा काटोल २) बिरीश सुदर्शनराव टिपले, रा. बाडगेनगर कोंढाळी ३) अमित जयसिंग मारवाडी, रा. खुटंबा पारधी बेडा काटोल ४) धुरया ताईतगिरी भोसले, रा. उमठा नरखेड ५) दत्तु रामप्रसाद पवार, रा. धरतवाडा काटोल ६) चंदन गोवर्धन राजपुत, रा. फेटरी काटोल ७) शिवदास दामु राजपुत, रा. खुंटबा काटोल** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम ४२००/—रूपये ०२) वेगवेगळया कंपनीची ०४ दुचाकी वाहने असा एकूण किंमती १,८४,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोस्टे काटोल हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक १३/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काटोल शहरामधील नेहरू आठवडी बाजार येथे काही इसम हे लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता काटोल शहरामधील नेहरू आठवडी बाजार येथे आरोपी क्रं १) आशिष सुरेंद्र राजुरकर, वय ४८ वर्ष, रा. पेठबुधवार ता. काटोल, जिल्हा नागपूर २) शैलेश बाबुराव डांगोरे, वय ३८ वर्षे, रा. पंचधार तालुका काटोल हे कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आले. पोलीसांनी

घटनास्थळावरून रोख रक्कम २८२०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य असा एकुण २८२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी क्रं १) आशिष सुरेंद्र राजुरकर, वय ४८ वर्ष, रा. पेठबुधवार ता. काटोल, जिल्हा नागपूर २) शैलेश बाबुराव डांगोरे, वय ३८ वर्षे, रा. पंचधार तालुका काटोल यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत हरविलेले/गहाळ झालेले आणि चोरी गेलेले ९ मोबाईलचा शोध घेवुन त्यांचे मुळ मालकांना परत देण्यात आले

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत मागील काही महीन्यात हरविलेले/गहाळ झालेले व चोरी गेलेल्या मोबाईलचा शोध घेणे कामी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.**

नमुद मोहीमे अतंर्गत श्री सागर खर्डे सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन सावनेर यांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मदतीने तांत्रीक पदधतीने शोध घेवून CEIR पोर्टलचा वापर करुन ९ नागरिकांचे मोबाईलचा शोध घेतला. दिनांक १२/१०/२०२६ रोजी सर्व मिळुन आलेले मोबाईल पोलीस स्टेशन सावनेर येथे पोलीस निरीक्षक श्रीमती ॠतुजा जाधव, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन सावनेर यांच्या हस्ते हे त्यांचे मुळ मालकांना परत केले.

**नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी त्यांचा मोबाईल हॅन्डसेट गहाळ झाल्या नंतर किंवा चोरीस गेल्यानंतर त्याची माहीती तात्काळ पोलीसांना द्यावी तसेच त्याबाबतची माहीती https://www.ceir.gov.in या पोर्टलवर माहीती भरून तक्रार नोंद करावी. त्यामुळे गहाळ झालेले किंवा चोरीस गेलेले मोबाईलचा तांत्रीक पदधतीने शोध घेता येईल.**



## जलालखेडा ते बोपापूर मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा झुडपे हटविण्याची कार्यवाही सुरू

पोलीस स्टेशन जलालखेडा :— जलालखेडा ते बोपापूर मार्गाच्या दुतर्फा वाढलेल्या झुडपांमुळे वाहनचालकांना होणारी संभाव्य अडचण लक्षात घेऊन जलालखेडा पोलीसांनी पुढाकार घेत संबंधित यंत्रणेशी समन्वय साधला आहे. पोलिसांनी ग्राम सडक योजना  अंतर्गत संबंधित कंत्राटदारास रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेली झाडे—झुडपे हटविण्याबाबत सूचना दिल्या.

.   सदर मार्गावरील झाडे—झुडपे हटविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कार्यवाहीमुळे रस्त्यावरील दृश्यमानता सुधारण्यास, समोरून येणारी वाहने स्पष्टपणे दिसण्यास तसेच वाहनचालकांना सुरक्षितपणे प्रवास करण्यास मदत होणार आहे. परिणामी, संभाव्य अपघातांचा धोका कमी होण्यास हातभार लागणार आहे. तसेच,   फेब्रुवारी २०२४ नंतर सदर मार्गावर कोणताही रस्ता अपघात घडल्याची नोंद नाही.







## २०२१ पासुन पाहिजे आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे दाखल असलेल्या अप. क्र. १६७/२०२१ कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ भादंवि या फसवणुकीच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी विवेक दादुराम साठे, वय ५० वर्ष, रा. बालाजी वार्ड बल्लारपुर जि. चंद्रपुर हा गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हता. या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद पाहीजे आरोपीचा शोध घेतला आहे.**

**स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपी विवेक दादुराम साठे, वय ५० वर्ष, रा. बालाजी वार्ड बल्लारपुर जि. चंद्रपुर याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले. आरोपी मिळून आल्यानंतर त्यास पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन बोरी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन उमरेड** :– पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड आणि पोलीस उपनिरीक्षक श्री किरण महागावे यांनी पोलीस स्टेशन उमरेड येथे ज्येष्ठ नागरिक यांना सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

**पोलीस स्टेशन बेला** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांनी पोस्टे बेला हद्दीतील दुर्गादेवी मंडळ व डीजे मालक यांची मीटिंग घेऊन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— पोलीस निरीक्षक श्री. सुमित परतेकी प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक बावनकर यांनी मासोद हायस्कूल मासोद येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद कुरसुंगे पोलीस स्टेशन पाचगाव यांनी जिल्हा तरुण भारत पब्लिक स्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय डोंगरगाव येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक, तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली.**

## म्यूल अकाउंटद्वारे होणाऱ्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती

**नागरिकांनी अनोळखी व्यक्तींना स्वतःचे बँक खाते, ।ज्ड कार्ड, पासबुक किंवा इंटरनेट बँकिंगची माहिती वापरण्यास देऊ नये. तसेच, कमिशनच्या आमिषाने अनोळखी व्यक्तींची रक्कम स्वतःच्या खात्यात स्वीकारून इतर खात्यांत हस्तांतरित करू नये. अशा व्यवहारांमुळे नागरिक सायबर गुन्ह्यांच्या तपासात अडकण्याची व कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची शक्यता असते, याबाबत जनजागृती करण्यात आली.**

## पेन्शनधारकांसोबत होणाऱ्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती

**सायबर गुन्हेगारांकडून पेन्शनधारकांना पेन्शन सुरू ठेवणे, जीवन प्रमाणपत्र (Life Certificate) जमा करणे, KYC अद्ययावत करणे किंवा पेन्शनची थकबाकी मिळवून देण्याच्या बहाण्याने फोन केले जातात. बँक अधिकारी किंवा शासकीय कर्मचारी असल्याचे भासवून त्यांच्याकडून बँक खात्याची माहिती, ATM PIN, OTP व इतर गोपनीय माहिती मिळवून आर्थिक फसवणूक केली जाते.याबाबत जेष्ठ  नागरिकांना जनजागृती करण्यात आली.**

सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ ’सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.




ऑक्टोबर 2026
राष्ट्रीय
सायबर सुरक्षा
जनजागृती महिना







# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये १७ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १३/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत आरोपी १. शिवकुमार राधेलाल शाहु, वय ३४ वर्ष, रा. करगीलाल कोटा छत्तीसगड २. रूदल नंदलाल बनिया, वय ३२ वर्ष, रा. ह. मु. गुमथळा ३. सोनु सुभाष शर्मा, वय ३२ वर्ष, रा. ह. मु. गुमथळा हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन केळवद** अंतर्गत आरोपी १. दिनेश राजु राऊत, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, भागेमाहेरी, ता. सावनेर जि. नागपुर २. हरीराम भैय्याजी वराठे, वय ६१ वर्ष, रा. बेलमनडई, पोस्ट अंबाडा ता.जि. बैतुल (म.प्र) ह.मु. भागेमाहेरी ता. सावनेर जि. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी शिवराम धनसिंग धुर्वे, वय ४५ वर्ष, रा. तिघई ता. सावनेर जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पाचगाव** अंतर्गत आरोपी वसीम सिकंदर शेख, वय ३८ वर्ष, राह. यासीन प्लाट बडा ताजबाग मोची किराणा दुकान जवळ नागपुर जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कुही** अंतर्गत आरोपी अरून दयाराम बांन्ते, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र १३, कामठी रोड कुही हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत १. मोहम्मद शफी वल्द मोहम्मद ईस्लाम शेख वय ३८ वर्ष रा. डब्लु.सी.एल. कॉलनी चिफ हाउुस वायगाव घोटुर्ली २. संतोष जिय्यालाल ब्राम्हणे, वय ४७ वर्ष, रा. माता मंदिर च्या जवळ बुधवारीपेठ उमरेड हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोस्टे देवलापार अंतर्गत** रामु युवराज ठाकरे, वय ३३ वर्ष, रा. यतवाडी न्यु.तोतलाडोह तह रामटेक २. सोनु निंमलदास सारवा, वय २८ वर्ष,

रायतवाडी न्यु. तोतलाडोह तह रामटेक  हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोस्टे पारशिवनी अंतर्गत** महेश अंबादास वानखेडे, वय २४ वर्ष, राह. वार्ड क्र. ३, करंभाड ता. पारशिवनी जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे कोंढाळी अंतर्गत** शुभम शुध्दोधन पाटील, वय १९ वर्ष, रा. वार्ड न. ०२ खैरी ता. काटोल,  जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे बोरी अंतर्गत** आरोपी रोशन भयालाल साखरकर, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र ०६, हनुमान नगर बुटीबोरी ता.जि.नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे एमआयडीसी बोरी अंतर्गत** १. विजय कुरसिंह राय, वय २० वर्ष, रा. तारगाव चकीया पोस्ट बलुवा ग्राम तारगाव ह. मु वार्ड १ टेंभरी, ता. हिंगणा, जि. नागपुर २. मिथुन निरमल राजभर वय २२ वर्ष रा उपनीधरारा ठाणा सकळीया जि चंदैली हमु टेभरी वार्ड क्र १ ता हिंगणा जि नागपुर ३. सत्येंद्र विजयमल राजभर वय २६ वर्ष रा उकनी विरम राय धरहरा सकलडीहा धरहरा चंदौली उत्तरप्रदेश हमु स्टिल कंपन हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर